17-04-2025-Dai-02new_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/16/2025 10:59 PM Page 1



# वेळेचे नियोजन केल्यास परीक्षेत घवघवीत यश

## समुपदेशक सुषमा कवठणकर : आंबिये महाविद्यालयात विशेष व्याख्यान उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६ :** परीक्षेच्या पूर्वी आणि परीक्षेच्या कालावधीत वेळेचे योग्य नियोजन केल्यास कोणत्याही तणावाला सामोरे जावे लागणार नाही, शिवाय परीक्षेत घवघवीत यश मिळेल, असे प्रतिपादन आंबिये महाविद्यालयातील समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी केले.

कोंकणी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून तणावाचे व्यवस्थापन या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्या डॉ.ल्युसी जेम्स, कार्यक्रमाच्या मुख्य संयोजिका कोकणी विभागातील प्राध्यापिका मानसी धाऊसकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य आणि प्रभारी कोंकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स यांनी या विशेष व्याखानाचे आयोजन केल्याबद्दल संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. मानसी धाऊसकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर यांची ओळख आर्या राऊत यांनी करून दिली. सूत्रसंचालन सानिका गावकर यांनी केले तर आभार नम्रता सामंत यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.



**विर्नोडा: मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या आणि आणि प्रभारी कोकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स, व्याख्यानाच्या मुख्य संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर, प्राध्यापक वर्ग व मान्यवर.**

### सोशल मीडियाचा वापर टाळा

परीक्षेच्या वेळी शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे स्वास्थदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. ते व्यवस्थित राखणे प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर टाळावा, त्यामुळे कोणत्याही प्रकारचा तणाव उद्‌भवणार नाही, असे यावेळी सांगण्यात आले.

### प्रभावी सादरीकरणामुळे विद्यार्थी भारावले

समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी पारंपरिक व्याख्यानपद्धतीला छेद देत पीपीटी सादरीकरणासह विद्यार्थ्यांना सहज आणि सुलभपणे विषय समजावून सांगितल्याने विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा खूपच लाभ झाला. शिवाय व्याख्यान संपल्यानंतर १० मिनिटे ध्यानधारणेचे महत्त्व सांगून ते विद्यार्थी आणि शिक्षकांकडून करून घेतल्याने त्याचा फायदा विद्यार्थी व शिक्षकांनाही झाला.

# पार्से येथील नंदू पार्सेकरला 'प्रभुदेसाई'कडून आर्थिक मदत

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १६ :** पार्से येथील बेरोजगार युवक नंदू पार्सेकर याला पार्से येथील प्रभुदेसाई फाउंडेशन तर्फे घर दुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले. प्रभुदेसाई फाऊंडेशनचे विश्वस्त देवेंद्र प्रभुदेसाई यांच्या हस्ते ही आर्थिक मदत नुकतीच श्री. पार्सेकर यांना प्रदान करण्यात आली. यावेळी त्यांच्यासोबत मिगेल फर्नांडिस, राजन कांबळी अन्य नागरिक उपस्थित होते.

देवेंद्र प्रभुदेसाई म्हणाले की, नंदू पार्सेकरसारखे युवक आज नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना कुणाचा आधार नाही. आर्थिक परिस्थितीमुळे ते आपले राहते झोपडी वजा घर दुरुस्त करू शकत नाहीत. सरकार मोठमोठ्या घोषणा करते अंत्योदय तत्त्वावर चालत असल्याचा प्रचार करते, मात्र नंदूसारख्या गरजूंना कोणत्याच प्रकारची मदत मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. अशावेळी प्रभुदेसाई फाऊंडेशन त्यांना अल्पशी आर्थिक मदत देऊ केली आहे. समाजातील अन्य दात्यांनीही त्यांना मदत करावी, असेही ते म्हणाले.

यावेळी प्रभुदेसाई फाऊंडेशनचे विश्वस्त देवेंद्र प्रभुदेसाई यांनी आपल्याला घर दुरुस्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल नंदू पार्सेकर यांनी त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.

# लोकशिक्षण हायस्कूलचा दहावीचा निकाल ९५ टक्के

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६ :** धारगळ येथील लोकशिक्षण हायस्कूलचा यंदाचा दहावीचा निकाल ९५% लागला. यावर्षी २० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यात ३ विद्यार्थी विशेष श्रेणीत, ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. दीपिका नाईक ही विद्यार्थिनी ८५% गुण मिळवून शाळेत प्रथम आली. अंकुश रेवडकर याने ८०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला तर आर्या गणपुले हिने ७९% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. यावेळी शाळेचे अध्यक्ष विकास प्रभुदेसाई, व्यवस्थापक मनोज कुलकर्णी, संस्थेची कार्यकारिणी, मुख्याध्यापिका, पालक शिक्षक संघ यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# निसर्गाच्या संवर्धनासाठी लेखन प्रभावी माध्यम

▶ **राजेंद्र केरकर यांचे प्रतिपादन : आंबिये महाविद्यालयात विशेष व्याख्यान उत्साहात**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६ :** निसर्गाच्या संरक्षणासाठी जनजागृती ही अत्यंत महत्त्वाची असून ही जनजागृती लेखनाच्या माध्यमातून अधिक प्रभावी आणि व्यापकपणे होऊ शकते. त्यामुळे लेखन हे निसर्गाच्या संवर्धनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे प्रतिपादन पर्यावरणप्रेमी, अभ्यासक आणि सुप्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र केरकर यांनी केले.



**पेडणे : विद्यार्थ्यांसोबत मुख्य मार्गदर्शक राजेंद्र केरकर, समन्वयक प्रा.आनंद कोळंबकर, संयोजक डॉ. नयन राणे, प्रा. स्मिता केरकर व इतर मान्यवर.**

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथील भाषा केंद्रार्ते आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरण संवर्धनातील साहित्याची भूमिका या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. केरकर बोलत होते. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.ल्युसी जेम्स, भाषा केंद्राचे मुख्य समन्वयक प्रा.आनंद कोळंबकर, व्याख्यानाच्या मुख्य संयोजक डॉ. नयन राणे, प्रा. स्मिता केरकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी भाग्यश्री वडर हिने प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन नयनी पेडणेकर यांनी केले. तर आभार श्रुती चोपडेकर यांनी मानले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागातील डॉ. नयन राणे आणि कोंकणी विभागातील प्रा. स्मिता केरकर यांनी केले. यावेळी प्रा.केतकी वझे, प्रा.वृद्धी लोटलीकर, प्रा.अनिजा शिरोडकर, प्रा. मानसी धावसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आशयाला पूरक ठरणारे वेगवेगळे संदर्भ, सूक्ष्म निरीक्षण, पर्यावरणासंबंधीचे खोलवर चिंतन आणि प्रचंड अनुभवविश्व यांचा अनोखा मिलाफ प्रा.राजेंद्र केरकर यांच्या मांडणीतून विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाला. त्यामुळे या व्याख्यानाचा अतिशय एकरूप होऊन विद्यार्थ्यांनी आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांचा या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या व्याख्यानाचा एकूण ४८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



# खरपाल चव्हाटेश्वर देवस्थानच्या सुशोभीकरणाचा शुभारंभ

टीम दैनिक हेराल्ड

▶ **मागणी मान्य झाल्याने ग्रामस्थांत समाधान**

साळ, दि. १६ : खरपाल येथील चव्हाटेश्वर देवस्थानच्या फरशा बसवून सुशोभीकरण कामाचा आमदार निधीतून १५ लाख खर्चून नुकताच डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा पंचायत सदस्य प्रदीप रेवोडकर, स्थानिक पंच नरेश गावस, पंच पद्माकर मळीक, महेश गावस व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिरे ही गावची भूषणे असून यात लोकांची श्रद्धा भावना दडलेली असते. त्यातच रखडलेल्या कामाला गती दिल्यास तिथला परिसर आणखीनच स्वच्छ वाटू लागतो. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखाली सरकारचे गावातील विकासकामावर बारीक लक्ष असून लोकांची मागणी आणि गरज ओळखून कामे केली जात आहेत. प्रदीर्घ काळाची गावच्या लोकांची मागणी पूर्ण होत असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांचे आभार मानले.

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II AT PONDA-GOA**

Case No: JM/TNC/B1/Shiroda/6/2023

1. Mr. Phalgun Roulu Naik Shirodkar r/o H. No. 120, Near Khutadevi Mandir, Gadder, Tarvalem, Shiroda, Ponda - Goa. ......Applicant.

V/S

1. Shiva Ganaba Prabhudessai, Saritabai Shiva Ganaba Prabhudessai (SD), Since deceased represented by their-Grand-son,
1. (a) Shri. Ramaji Balkrishna Prabhu Gaonkar, H. No. 139, Maingal, Tarvalem, Shiroda, Ponda-Goa
2. Mr. Narayan Venkatesh Prabhu Desai (SD) Represented by his legal heirs,
2 (a). Smt. Anapurnabai Naraina Porobo Desai @Sindhu Boto Chipluncar @ Sindhu Narayan Prabhu Dessai, R/o H. No. 16, Tarvalem, Shiroda, Ponda - Goa
3. Mr. Mahesh Ramchandra Prabhudessai and his wife, Meghana M Prabhu Dessai (SD), Since deceased represented by their legal heirs,
3 (a) Smt. Manisha Sushant Prabhu Sawkar- @Maya Mahesh Prabhu Dessai,
3 (b) Shri Sushant Subhash Prabhu Sawkar, Both R/o of American Nationals, R/o of 29, Cottage place, Dr. Robbinville, New Jersey, USA Represented herein by her Power of attorney. Mrs. Vanita Prabhudesai
3 (c) Shri Vallabh Porobo Dessai @ Vallabh Mahesh Prabhu Dessai
3 (d) Mrs. Vinita Vallabh Porobo Dessai- @Vinita Vallabh Prabhu Dessai, both residents of H.No. 17, Tarvale, Shiroda, Ponda-Goa,
4. Smt. Laxmi Roulu Naik Shirodkar, R/o H.No. 120, Near Khutadevi Mandir, Gadder, Taravalem, Shiroda, Ponda-Goa
5. Mr. Umesh Roulu Naik Shirodkar, R/o H.No. 120, Near Khutadevi Mandir, Gadder, Taravalem, Shiroda, Ponda-Goa,
6. Mrs. Chandani Roulu Naik Shirodkar, R/o Gharbhat, Vazem, Shiroda, Ponda-Goa and after marriage presently residing- at H. No. 27/1, Behind GMC, Bambolim Village, Tiswadi-Goa.
7. Diksha Pravin Desai r/o Dalem Shetkarwada, Cancona-Goa
8. Deepa Shivdas Fadte r/o Varra, Sanvordem-Goa
9. Mrs. Rupa Yushudas Pillai, R/o Gharbhat, Vazem, Shiroda, Ponda-Goa. ...Respondents

**PUBLIC NOTICE**

**To,**

The Respondent No. 1(a) & 2(a)

**WHEREAS** the above mentioned tenancy case under Section 7 of Agricultural Tenancy Act 1964.

**AND WHEREAS,** notices were sent to the above Opponents by registered A/D but some of the Notices have been returned back to this Court by the postal authority with remarks as **"Address not known in the locality and party not residing".**

**AND WHEREAS,** the applicant moved an application on 20/03/2025 and prayed before this Court for Public Notice to be published in the local newspaper as substitute service to the above named Opponents who have not been served with the notice. And whereas, this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

Therefore, the notice is hereby given to the above Respondents to appear before this Court in person or by duly authorized agent on **28/4/2025 at 10.30 a.m.** to give your say on the above mentioned date and time. Take notice that in default of your appearance the application will be heard and decided in your absence.

Given under my hand and the seal of the Court, dated 20th day of March, 2025.

SEAL

Sd/- (**Rosario Carvalho**)
Joint Mamlatdar II of Ponda Taluka, Ponda- Goa.

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF PONDA TALUKA, PONDA GOA**

Case No. Mam/Tnc/B2/ Shiroda/2024

1. Phalgun Roulu Naik Shirodkar R/o.H.no. 120, Near Khutadevi Mandir Gadder Taravalem Shiroda Ponda Goa. ....Applicant

V/s

1. Shiva Ganaba Prabhudesai (SD) Ramaji Balkrishna Prabhu Gaonkar R/o.H.no.139, Maingal Tarvalem Shiroda Ponda Goa.
2. Narayan Venkatesh Prabhu desai (SD) Anapumabai Naraina Porobo Desai R/o. H.no. 16, Tarvalem Shiroda Ponda Goa.
3. Mahesh Ramchandra Prabhudesal (SD) Manisha Sushant Prabhu Sawkar, Sushant Subhash Prabhu Sawkar both R/o.American Nationals both r/o. 29, Cottage place, Dr. Robbinville New Jersey, USA. Vallabh Poroba Desai, Vinita Valaba Poroba Dessai both r/o. H.no. 17,Tarvale, Shiroda, Ponda Goa.
4. Subhash Mangaldas Naik r/o. H.no. 293/3, Vazem, Shiroda, Ponda-Goa.
5. Laxmi Roulu Naik Shirodkar R/o.H.no.120, Near Khutadevi Mandir Gadder Taravalem Shiroda, Ponda Goa.
6. Umesh Roulu Naik Shirodkar, R/o. H. no. 120, Near Khutadevi Mandir Gadder, Taravalem Shiroda Ponda Goa.
7. Chandani Roulu Naik Shirodkar R/o.Gharbhat Vazem Shiroda, Ponda-Goa.
8. Diksha Pravin Desai R/o. Dalem Shetkarwada, Cancona Goa.
9. Deepa Shivdas Fadte R/o.Varra, Sanvordem Goa. 10. Rupa Yushudas Pillar R/o. Gharbhat Vazem Shiroda Ponda Goa. ....Opponents

**Public Notice to The Respondents Nos.2(a), 3 (a), 3(b), 3(c), 3(d), 5, 6, 7 and 10**

**PUBLIC NOTICE**

WHEREAS the above named applicants have filed an application U/s 7 of Agricultural Tenancy Act. (Protection from Eviction) Act, 1975.

AND WHEREAS the notice sent to the above mentioned Respondents are not served. It is reported by the applicants that they are unaware of the anyother addresses of the opponents.

AND WHEREAS after considering the case of the applicants the Court come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.

Therefore notice is hereby given to the above mentioned respondent to appear in this court on **16/4/2025 at 3.00 p.m.** alongwith material evidence on which they wish to rely upon in person or through duly authorized agent failing which order shall be passed and the matter will be decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this the 26th day of March, 2024.

SEAL

Sd/- (**Bhiku L. Gavas**)
Mamlatdar of Ponda Taluka
Ponda Goa.

# बाबासाहेबांमुळेच वंचित मुख्य प्रवाहात : कवळेकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१६ :** घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच भारतातील वंचित, उपेक्षित वर्गातील नागरिकांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात येण्याची संधी व सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला. सामाजिक विषमता दूर करत सर्वांना राजकीय, सामाजिक समानता देण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले, असे उद्‌गार माजी उपमुख्यमंत्री व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत (बाबू) कवळेकर यांनी काढले.

बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बार्से – केपे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. या कार्यक्रमात कवळेकर यांच्या हस्ते बार्सेचे प्रभाकर परवार यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा पंचायत सदस्य खुशाली जोरगो वेळीप व शाणू वेळीप, भाजपचे केपे मंडळ अध्यक्ष कृपेश वेळीप, सरचिटणीस अर्जुन (अण्णा) वेळीप, दयानंद बांदोडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक गोविंद वेळीप, एसटी विकास महामंडळाचे संचालक खुशाली वेळीप, केपे मंडळाच्या एसटी मोर्चाचे अध्यक्ष संदेश वेळीप यावेळी उपस्थित होते.

बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजातील सर्व घटकांचा तसेच सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थितीचा यथायोग्य अभ्यास करून आदर्श अशी घटना तयार केली. आमच्या देशाचा संपूर्ण कारभार या घटनेनुसारच चालतो. सांस्कृतिक, सामाजिक वैविध्य असलेला भारतीय समाज व देशाची एकात्मता अखंड राहावी अशा दूरदृष्टीने त्यांनी ही घटना तयार केली असे कवळेकर पुढे म्हणाले. भाजपच्या केपे एसटी मोर्चाचे अध्यक्ष संदेश वेळीप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**PUBLIC NOTICE**

My client intends to purchase the property described in the Schedule-I (First Property) from **MR. SHEIKH GAUSE alias SHAIKH GAUS alias GAUSE XEC alias SHEIKH** and his wife **MRS. KHATIZA BI SHEIKH** alias **KHATIJA BI GAUSE** and the property described in Schedule-II (Second Property) from their children **MISS SHIFA SHEIKH** and **MR. ABDUL GAFFER SHEIKH.**

Any person claiming any right, title and/or interest in the below described properties or having any objection to the sale of such properties, may intimate in writing to the undersigned within **15 days** from the date of publication of this notice, giving complete details of the nature of the claim and the name and address of the objector. If no valid objection is received within the said period, my client shall assume that there are no objections to the said transaction and my client shall be free to proceed with the said purchase.

**SCHEDULE-I**

(Description of the First Property)

All that Plot of Land independently surveyed under SURVEY NO. 133/6-C of village Benaulim of Salcete Taluka, South Goa District, State of Goa, admeasuring 885 sq.mtrs, bounded on the east by S.No. 130/8, on the west by S.No. 133/5, north by S. No. 130/8 and on the south by S.Nos. 133/6-B-1, 133/6-B and 133/6.

**SCHEDULE-II**

(Description of the Second Property)

All that Plot of Land independently surveyed under SURVEY NO. 133/6-B of village Benaulim of Salcete Taluka, South Goa District, State of Goa, admeasuring 1900 sq.mtrs, bounded on the east by Survey No. 134/2 now the eastern bypass, on the west by Survey No. 133/6-B- 1 and 133/6, on the north by Survey No. 133/6-C and eastern bypass and on the south by Survey No. 133/6.

Both the above properties are separated portions of the larger known as REBODA, the first addition identified in the record of Rights as REBOR, which is situated at Village Benaulim, Taluka and Sub-District of Salcete, District of South Goa and State of Goa, within the jurisdiction of Village Panchayat of Cana-Benaulim and described in the Land Registration Office of Salcete under No. 9045 at Folios 146 overleaf of Book B-23 of New Series and enrolled in the Taluka Revenue Office of Salcete under matriz No. 512.

SEAL

Date: 15.04.2025

Sd/- **PRITAM DA PIEDADE MORAIS**
BSc.LLM.
ADVOCATE
Chamber: 'Morais Residence', Near A. V. Da Costa Hospital, Altinho-Fatorda, Salcete, Margao, Goa.
Email: morais_pritam@yahoo.co.in
Mobile: 9422386656/9552882002

**CHANGE OF NAME**

I, **SANJAY VISHWANATH PRABHU KHANOLKAR** R/O SA-1, Riddhy Plaza, Shantinagar, Near Dangui Bakery Ponda, PONDA, North Goa 403401. Holder of Indian Passport No. M7992160, hereby change my name from **SANJAY VISHWANATH KHANOLKAR,** to **SANJAY VISHWANATH PRABHU KHANOLKAR,** Here after in all my dealings & document I will be known as **SANJAY VISHWANATH PRABHU KHANOLKAR.** If anybody has any objection they should inform to Passport Office within 15 days from the Publication of this Notice.

SD/- **SANJAY VISHWANATH PRABHU KHANOLKAR**

**BEFORE THE DY. COLLECTOR & S.D.O. MAPUSA SUB DIVISION, MAPUSA, GOA**

**Case No. LRC / MUT / APL / BAR-I / 18 / 2024**

1. M/s Santa Monica Star LLP, office of the Registrar of Firms, Bardez, Goa, Represented by its Partner Mr. Chinmay Vishwasrao Patil, R/o H. No. 199, Verem, Ambekhand, Reis Magos, Bardez, Goa .......Appellant

V/s

1. Mrs. Angelina D'Souza, widow of Kenneth D'Souza, R/o Flat No. 556, Sunehari Bagh Apt., Sector 13, Rohini Sector 7, Delhi 110085 ..... Respondent

**PUBLIC NOTICE**

To, The unkown Legal heirs of expired Respondent Kenneth D'Souza / any other interested parties

Whereas, the above named appellant has filed an appeal against the Order dated 12/10/2024 passed by the Mamlatdar of Bardez / Certifying Officer in mutation Case No. 97566/Assagao in respect of property bearing Survey No. 80/3 of Village Assagao, Bardez, Goa to delete the name of the deceased respondent Kenneth D'Souza from Occupants Column of Form I & XIV of Survey No. 80/3 of Village Assagao.

AND WHEREAS, the notices issued to the respondent, the respondent filed her Affidavit cum no objection stating that she is the only legal heirs of the deceased respondent Kenneth D'Souza.

AND WHEREAS, vide application dated 09/04/2025, the Appellant has submitted that he is not known any other legal heirs of the respondent or any other interested parties, therefore prayed for substitute service of notice.

AND WHEREAS, considering the above fact, I am satisfied that this is a fit case to order for such publication of notice in terms of Order V Rule 20(1A) of C.P.C. 1908.

Therefore, notice is hereby given to the above respondents/their legal heirs to appear before this Court on 16/05/2025 at 3.00 p.m. either in person or through authorized agent to give their say in the matter, failing which the application will be determined and decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this 15th day of April 2025.

Sd/- **Varsha S. Parab**
Dy. Collector & S.D.O.- I,
Mapusa Sub Division, Mapusa, Goa
Seal

Government of Goa

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR & NOTARY EX-OFFICIO, PONDA**

Rajdeep Galleria, First Floor, Sadar, Ponda Goa.
Phone/Fax 9405864626,
E-mail:crsrponda-rd.goa@nic.in

CR/SR/PON/391/2025 Dated:- 03/04/2025

**NOTICE**

Dr. Gouresh G. Bugde. Civil Registrar-cum-Sub Registrar-I and Special Notary Ex-Officio of this Judicial Division of Ponda Goa.

In accordance with Section 346 (11) of "The Goa Succession, Special Notaries and Inventory Proceeding Act. 2012" it is hereby made public that by Notarial "Deed of Declaration of Heirship" drawn by and before me on 2nd day of April of the Year Two Thousand and Twenty Five at pages 132 onwards of Book No. 441 of this office, the following is recorded;

That on 26/05/2020 (Twenty Sixth May, Two Thousand And Twenty), died Flaviano Costa, at primary Health Centre Shiroda and who was permanent resident of H. No. A-103, Amblai, Panchawadi, Ponda, died intestate without making will or any other testamentary disposition in respect of his estates, leaving behind him, his widow/wife Mrs. Catarina Colaco, Indian National, as 'Moiety Holder/Half Sharer' and his Children's (One) Elsie Costa also known as Elsie D'Costa, major, married to Mr. Caetano Antonio Fernandes (Two) Felina Costa also known as Felina D'Costa, major, married to Mr. Pedro Fernandes (Three) Mr. Chris Brando Costa, major, married to Leena Fernandes (Four) Valita Costa, major, married to Doyle Joseph Fernandes, all are Indian Nationals and as 'Universal Legal Heirs' to this Deed.

That besides the said Heirs there does not exists any other person or persons according to Law of Succession prevailing in the State of Goa who may concur with them to the estate left by the deceased person.

Any person having objection to this Deed may file their objection in this office within one month from the date of its publication.

Dated: 03/04/2025
Place: Ponda

SEAL

Sd/- (**Dr. Gouresh G. Bugde**)
Special Notary, Ponda Goa
Civil, REGISTRAR
CUM - SUB - REGISTRAR, PONDA

# सरस्वती विद्यालयाच्या चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**कवळे : निरोप समारंभानिमित्त चौथीच्या विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १६ :** कवळे येथील श्री सरस्वती विद्यालयातील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या निरोप समारंभास व्यासपीठावर मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर, पालक – शिक्षक संघाचे अध्यक्ष गौरेश नाईक व अन्य पदाधिकारी, शिक्षिका साक्षी नाईक, शुक्ला नाईक, पूजाली रामनाथकर, प्रतिभा पेडणेकर, कृतिका शेट, शिक्षक गीतेश वेरेकर आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर, गौरेश नाईक तसेच अन्य शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पालकांतर्फे प्रशांत सतरकर व माया गावडे यांनीही शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांतर्फे संजना, आर्या, श्रव्या, सृष्टी, प्रशांत, आदिराज, आराध्या, ओंकार, मन्वीक , आरोही व श्रेया या मुलांनी शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञतापर विचार व्यक्त केले. चौथीच्या पालकांनी शाळेला भेटवस्तू दिली.यांनतर विद्यालय व पालक – शिक्षक संघातर्फे सर्व मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या.



**साखळी : पंडित गुरुवर्य तुळशीदास नावेलकर यांच्याहस्ते विजय विनायक गावस यांचा केलेला मरणोत्तर सत्कार स्विकारताना गौतम विनायक गावस. सोबत महेश गावस, विवेक गावस व राजू गावस.**

# स्व. विजय गावस यांचा मरणोत्तर सत्कार

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १६ :** न्हावेली साखळी येथील श्री देव रवळनाथ देवस्थानाच्या प्रांगणात रामनवमीनिमित्त ठेवलेल्या एका कार्यक्रमात, श्री रवळनाथ भजनी मंडळातर्फे कै. विजय विनायक गावस यांचा मरणोत्तर सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पंडित गुरुवर्य तुळशीदास नावेलकर, संवादिनी वादक महेश गावस, रवळनाथ भजनी मंडळाचे अध्यक्ष विवेक गावस, सचिव राजू गावस व सत्कार स्विकारण्यासाठी त्यांचे बंधू गौतम विनायक गावस उपस्थित होते.

पंडित गुरुवर्य तुळशीदास नावेलकर यांनी श्रीफळ, शाल व स्मृतिचिन्ह गौतम विनायक गावस यांच्या हाती देऊन विजय विनायक गावस यांचा सत्कार केला.

छोटेखानी समारंभाचे सूत्रसंचालन गोविंद भगत यांनी केले.

यावेळी भगत यांनी सांगितले की, नावेली गावातील एक अष्टपैलू,कलाकार व व्यक्तिमत्व जो नाटकात, भजन, गायन क्षेत्रात आपले नाव कमावून गेला अशा कलाकाराला रवळनाथ भजनी मंडळ व हा गाव नेहमी त्यांची आठवण करीत राहील. रवळनाथ भजनी मंडळाला तो लहानपणापासून वावरला होता, त्याने गावामध्ये सादर केलेल्या आजपर्यंत अनेक नावाजलेल्या नाटकात जसे संगीत स्वयंवर, संगीत सौभद्र, अमृत मोहिनी, संत गोरा कुंभार,इत्यादी नाटकामध्ये भाग घेऊन आपली शाप वठवली होती. इथे ओशाळला मृत्यूमध्ये त्याची संभाजीची भूमिका कमालीची होती. कला अकादमीच्या अ व ब नाट्य गट स्पर्धेत सुद्धा त्यांने भाग घेतला होता. शेवटी सर्वांनी एक मिनिट स्तब्धता पाळून विजय विनायक गावस यांना श्रद्धांजली वाहिली. तद्नंतर रवळनाथ भजनी मंडळातर्फे ''संगीत राजा रुक्मांगद' हे नाटक सादर करण्यात आले.